2025_26_PRE_I

EDUTECH ACADEMY
NURTURING THE FUTURE....

SET : 01

— SCHOOL SECTION —

STD : X CBSE

# PRE EXAM – I

TIME : 3:00 Hrs

SUB : MARATHI (009)

DATE : 5th December, 2025

MM :80

**General Instructions:**

१. या प्रश्नपत्रिकेत – अ,ब,क,ड – चार विभाग आहेत
२. सर्व विभाग आवश्यक आहेत.
३. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
४. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

**विभाग अ**

**प्र१) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून लिहा.**

चार माणसे शेजारीपाजारी पारावर, शाळेत ,कचेरीत, बसमध्ये ,आगगाडीच्या डब्यात या ना त्या निमित्ताने थोडा वेळ जरी एकत्र जमली की, त्यांच्या बोलण्याचा गप्पांचा आणि चर्चेचा विषय असतो. इतरांच्या चुका, इतरांचे दोष, व इतरांची टवाळी! म्हणजे ही एक प्रकारची परनिंदाच चाललेली असते,असे म्हणा ना! मध्याची नशा चढावी त्याप्रमाणे परनिंदेची धुंदी माणसास चढत असते. परनिंदा करणारा माणूस स्वतःच्या अंत:करणातील आणि सभोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता नाहीशी करून सर्वत्र दुःखाचे, औदाशिण्याचे , निराशेचे, मत्सराचे आणि द्वेषाचे वातावरण निर्माण करण्यास हातभार लावत असतो. धूर ओकणाऱ्या ज्योतिमुळे दिव्याची काच धुरकटून जाते आणि दिव्याचा प्रकाश पार हरपून जातो.मात्र ज्योतीची काजळी झटकली, ती मर्यादित ठेवली व दिव्यांवरील काच रोज सकाळी वा संध्याकाळी स्वच्छ पुसली की प्रकाश अवतीभवती लख्ख पसरतो.अंधकाराचा लोप होऊन वातावरण उजळून निघते.तसेच आपण रात्री झोपण्यापूर्वी किंवा पहाटे उठण्यापूर्वी मनाच्या काचेवर सतत इतरांच्याअवगुणांच्या विचाराने जमलेली काजळी अंतकरणातील क्षमेच्या राखेने स्वच्छ पुसली कीआपले मन दिवसभर टवटवीत राहते. जिथे जिथे आपण जाऊ तेथे तेथे प्रसन्नताच निर्माण करण्यास आपला हातभार लागेल.

**अ) खालील प्रश्नांचा योग्य पर्याय निवडून लिहा : (कोणतेही तीन)** ३

**१) 'पहाट' या शब्दाचा अर्थ खालील पर्यायापैकी कोणता आहे?**

अ) रात्र  ब) सकाळ  क) उष:काल  ड) संध्याकाळ

**२) लोक एकत्र येवून कोणत्या गप्पा करतात?**

अ) इतरांच्या चुका ब) इतरांचे दोष क) इतरांची टवाळी ड) यापैकी सर्व

**३) मद्याची नशा चढावी तशी कशाची नशा चढते?**

अ) परनिंदेची ब) परदु:खाची क) शेजाऱ्यांची ड) स्वतःची

**४) उताऱ्यात कशावरील काजळी झटकण्यास सांगितली आहे?**

अ) परनिंदा ब) स्वतःची क) माणसाची ड) मनाची

**ब)खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : ( कोणतेही तीन).** **३**

१) 'टवाळी करणे' या शब्दाचा अर्थ काय आहे?

२) 'अवगुण' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?

३) उताऱ्यात कोणता उपदेश केला आहे?

४) माणसे एकत्र बसून काय करतात?

**ड) खालीलपैकी कोणत्या एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा.** **२**

१) उताऱ्याचा तुम्हाला समजलेला अर्थ थोडक्यात सांगा

२) मनावरची काच पुसणे म्हणजे काय ? याचा अर्थ थोडक्यात लिहा.

**प्र२. खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून लिहा.**

बाहेरचा अपरंपार संसार मनात भरलेला असतो. तो बंद केल्याशिवाय एकाग्रता अशक्य.आपल्या आत्म्याची अपार ज्ञानशक्ती बाह्य क्षुद्र वस्तुस्तच आपण खर्च करतो, परंतु असे होता कामा नये.ज्याप्रमाणे दुसऱ्याला न लुटता व स्वतःच्या प्रयत्नाने श्रीमंत झालेला मनुष्य अनाठायी खर्चणार नाही, त्याप्रमाणेच आपण आपल्या आत्म्याची ज्ञानशक्ती शूद्र वस्तूंच्या चिंतनात खर्च करू नये, ही ज्ञानशक्ती हा आपला अमूल्य ठेवा आहे; परंतु स्थूल विषयात आपण खर्च करतो. ही भाजी म्हणे चांगली नाही झाली. हीच्यात मीठ कमी झाले. किती गुंजा बाबा कमी झाले. मीठ अर्धा कण कमी पडले या महान विचारातच आमचे ज्ञान खर्च होते.लहान मुलांना शाळेच्या चार भिंतीच्याआत शिकवतात.झाडाखाली घेवून बसतील तर कावळे, चिमण्या पाहून त्यांचे मन म्हणे एकाग्र होणार नाही.लहान मुलेच ती.कावळा चिमणी दिसली नाही म्हणजे झाली त्यांची एकाग्रता? परंतु आम्ही झालो घोडे आम्हाला,आम्हाला शिंगे फुटली. आमची एकाग्रता सात सात भिंतीच्या आत, कोणी आम्हास ठेवले तरी व्हावयाची नाही कारण दुनियेतील बारीक सारीक गोष्टीची आम्ही दवडणार व त्यात कृतार्थता मांनणार.

१) मनाची एकग्रता केव्हा वाढेल?

अ) स्वतःच दुःख कमी केल्यावर ब) बाहेरील संसार सोडल्यावर

क) मीठ खाल्यावर ड) झाडाखाली बसल्यावर

२)आपली अपार ज्ञानशक्ती कुठे खर्च करतो?

अ) लोकांसाठी ब) बाहेरच्यासाठी क) क्षुद्र वस्तुत ड) चांगल्या वास्तूत

३)आपला अमूल्य ठेवा कोणता आहे?

अ) आत्मशक्ती　　ब) ज्ञानशक्ती　　क) अनाठायी खर्च　　ड) बुद्धिमत्ता

४) कशात आमचे ज्ञान खर्च होते

अ) मीठ खाण्यात　　ब) महान विचारात　　क) ज्ञानशक्तीत　　ड) कावळे पाहण्यात

५) कोणती व्यक्ती अनाठायी खर्च करणार नाही?

अ) लहान　　ब) गरीब　　क) श्रीमंत　　ड) मोठी

६) एकाग्रता नष्ट होण्यासाठी उताऱ्यात कोणते उदाहरण दिले आहे?

अ) कावळा　　ब) भिंती　　क) शिक्षक　　ड) घोडे

७) 'अनाठायी ' या शब्दाचा अर्थ कोणता?

अ) व्यर्थ　　ब) उपयोगी　　क) महत्व　　ड) यापैकी नाही

**(विभाग- ब )**

**प्र.३. (क) खालील प्रश्नांचा योग्य पर्याय निवडून लिहा (कोणतेही ४)** **४**

१) घराची **वाट** शोधताना पायांची **वाट** लागली (अधोरेखित शब्दाची जातीचा योग्य पर्याय ओळखा)

अ) सामान्य नाम, क्रियापद　　ब) क्रियापद, सामान्य नाम

क) क्रियापद, क्रियाविशेषण　　ड) दोन्ही सामान्य नाम आहेत

२) खालीलपैकी योग्य विधाने कोणती?

A) शब्दांच्या जातीमध्ये अव्यय प्रकारानाअविकारी शब्द म्हणतात.

B) कारण- या शब्दांच्या जातींमध्ये लिंग, वचन, विभक्ती यांच्यामुळे बदल होत नाही.

अ)' A' बरोबर ' B 'चूक　　ब)' A' ' B ' दोन्ही चूक

क)' A' चूक' B ' बरोबर　　ड)' A' ' B ' दोन्ही बरोबर

३) विशेषनाम _________________ असते.

अ) व्यक्तिवाचक　　ब) समुहवाचक　　क) जातीवाचक　　ड) विशेषण

४) पोपट झाडावर बसला आहे. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

अ) पोपट　　ब) झाडावर　　क) बसला　　ड) आहे

५) तिला काम करताना वेळेचे भान राहत नाही (सर्वनाम ओळखा)

अ) राहत　　ब) तिला　　क) करताना　　ड) काम

**प्रश्न ३. ख) सूचनेप्रमाणे उत्तर लिहा (कोणतेही ३)** **३**

१) श्रावणात सृष्टीत सर्वत्र हिरव्या रंगाची उधळण आढळते (या वाक्याचा काळ ओळखा)

अ) भूतकाळ　　ब) भविष्यकाळ　　क) वर्तमान काळ　　ड) वर्तमान काळ व भूतकाळ

२) आम्ही सर्वजण देवळात बसलो होतो. या वाक्याचे वर्तमान कालीन रूप कोणते होईल.

अ) आम्ही सर्वजण देवळात बसणार　　ब) आम्ही सर्वजण देवळात बसलो आहे.

क) आम्ही सर्वजण देवळात बसायचं　　ड) आम्ही सर्वजण देवळात बसणारं नाही.

३) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडू लागला (या वाक्याचा वर्तमानकालीन वाक्याचा योग्य पर्याय निवडा)

अ) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडेल   ब) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडावा

क) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडत आहे   ड) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडला

४) 'सर्वकाही तुझ्या मनाप्रमाणे घडेल.' साधूने राजाला.आशीर्वाद दिला. या दोन्ही वाक्यांचा काळ ओळखा

अ) वर्तमान काळ, भविष्यकाळ   ब) भविष्य काळ, वर्तमान काळ

क) भविष्यकाळ, भविष्यकाळ   ड) भविष्यकाळ, भूतकाळ

**प्रश्न ३ ग) सूचनेनुसार उत्तरे लिहा (कोणतेही ३)   ३**

१) निराश होण्याचे कारण काय? या वाक्याच्या विधानार्थी वाक्याचा योग्य पर्याय खालीलपैकी कोणता?

अ) निराश होऊ नको   ब) निराश होण्याचे काही कारण असावे ना?

क) किती ते निराश व्हायचे!   ड) निराश होण्याचे काही कारण नाही.

२) शाळेची ही वेळ आमच्या सोयीची नाही. या वाक्याचा प्रकार कोणता.

अ) विधानार्थी   ब) प्रश्नार्थी   क) उदगारार्थी   ड) यापैकी नाही

३) पू. ल.देशपांडे यांची नाटके कोणाला आवडत नाहीत. या वाक्याचा प्रकार ओळखा.

अ) विधानार्थी   ब) प्रश्नार्थी   क) उदगारार्थी   ड) यापैकी नाही

४) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काय केले नाही (वाक्याचा प्रकार ओळखून लिहा

अ) विधानार्थी   ब) प्रश्नार्थी   क) उदगारार्थी   ड) यापैकी नाही

**प्रश्न ३ घ) सूचनेनुसार उत्तरे करा (कोणतेही २)   २**

१) समानार्थी शब्दाची योग्य जोडी ओळखा

अ) चंद्र – शशी   ब) अमृत – विष   क) आनंद – दुःख   ड) ढग - वीज

२) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

अ) जमीन - झाड   ब) नदी - तरंगिणी   क) दिवस - वासर   ड) धनुष्य - कोदंड

३) खालीलपैकी समानार्थी शब्दाची योग्य जोडी ओळखा.

अ) लक्ष्मी - रजनी   ब) सूर्य - चंद्र   क) स्त्री - ललना   ड) देव - दानव

**प्रश्न४ क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही २)   २**

१) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दाची अयोग्य योग्य जोडी ओळखा.

अ) देशद्रोही × देशभक्त   ब) तेजी × मंदी   क) कर्णमधुर × कर्णकटू   ड) हात × कर

२) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दाची योग्य जोडी ओळखा.

अ) आदर × सन्मान   ब) इलाज × उपचार   क) कृश × स्थूल   ड) जमा × बचत

३) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दाची योग्य जोडी ओळखा.

अ) केसरी × सिंह   ब) शहाणा × ज्ञानी   क) नास्तिक × आस्तिक   ड) मोठा × थोरला

**प्रश्न४ ख) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही २)** **२**

१) खालीलपैकी भिन्न लिंगी शब्दाचा पर्याय ओळखा.

अ) दास ब) बेडूक क) तरुण ड) दांडी

२) खालीलपैकी भिन्न लिंगी शब्दाचा पर्यायओळखा.

अ) गाडी ब) सूरी क) आरशी ड) विद्वान

३) 'गायरान' या शब्दाचे लिंग ओळखा.

अ) पुल्लिंग ब) स्त्रीलिंग क) नपुंसकलिंग ड) यापैकी नाही

**प्रश्न४ ग) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही २)** **२**

१) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द ओळखा.

अ) भाषा ब) दिशा क) विद्या ड) लांडगा

२) खालीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी शब्द ओळखा.

अ) कुत्रा ब) आंबा क) फळा ड) पिसवा

३) जळू या शब्दाचे अनेकवचनी रूप कोणते?

अ) जळवा ब) जळका क) जळया ड) जाळ्या

**प्रश्न४ घ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही २)** **२**

१) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

अ) रामलक्ष्मण ब) पापपुण्य क) भाजीपाला ड) विटीदांडू

२) खालील शब्दाचा समास ओळखा.

बेशिस्त

अ) अव्ययीभाव ब) दविगु क) समाहार ड) वैकल्पिक

३) समान गुणधर्म असणाऱ्या एकाच जातीच्या घटकाचा समावेश होतो तो समास कोणता?

अ) अव्ययीभाव ब) दविगु क) समाहार ड) वैकल्पिक

**प्रश्न ५ अ) खालील खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा कोणतेही तीन** **३**

१) कवी नारायण सुर्वे यांच्यावर शाळेचा वर्षाव का झाला होता?

२) भिकोबा मुसळे यांनी एकूण किती गुलाबजाम खाल्ले?

३) पाहून बस कोठे रिकामी झाली!

४) रेखा मावशी का वरमल्या?

५) अब्दुल ने कानाला काय लपेटून घेतले होते?

**आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा (कोणतेही तीन).** ३

१) तपोवन मध्ये अब्दुल चा सत्कार.............. यांनी केला.

२) स्नेहल ने एकदम............. लगावला

३) पंधरवडा भरात फक्त दोन वेळाच........... झाला.

४) मला एकदम त्या............ वृद्धाची आठवण झाली

५) लेखक वाईला.............. अध्यक्ष म्हणून गेले होते.

**क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही एक).** ३

१) शाल व शालीनता यांचा पाठाच्या आधारे तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

२) दुसऱ्या दिवशी पण त्यांचा वृत्तभंग कसा झाला थोडक्यात स्पष्ट करा.

३ दाजी साहेबांनी अब्दुल चे कौतुक कोणत्या शब्दात केले?

**ड) खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा व वाक्य पुन्हा** ५

(उसंत न लावणे, एका पायावर हो म्हणणे चक्कर मारणे ताब्यात घेणे भेटीला लागणे)

१) विराज सायंकाळी सहज फेरी मारून आला.

२) लवकर सुटताच अंजलीला दारिद्र्य आले.

३) शत्रुने किल्ला कब्जात घेतला.

४) सहलीला जायला विना तात्काळ तयार झाली.

५) प्रथमेशला कामातून वेळ मिळत नसे.

**प्रश्न६ अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा (कोणतेही तीन)** ३

१) संत नामदेवांनी चातक कोणाला म्हटले आहे?

२) हात को गहाण पडले आहेत?

३) संत नामदेव यांनी लिहिलेल्या अभंगाचे नाव काय आहे?

४) कवितेत दीनदुबळे कोणाला म्हटले आहे?

५) कवीचा सर्वात जवळचा मित्र कोण?

**ब) रिकाम्या जागा भरा (कोणत्याही तीन)** ३

१) डोळ्यातीलआसवांची ज्योत ज्योत ...........

२) हिशोब करतो आहे किती राहिलेत........... उन्हाळे

३) ...................... लगलासे वनी। पाडस चिंतित हरणी॥

४) तेव्हाचअश्रू मित्र होऊन.................... . धावून आले.

५) भुकेले.............. । धेनू उंबरत धावे॥

**क) खालीलपैकी कोणत्याही एका ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **३**

१) शेकडो वेळा चंद्रा आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली.

२) संवेचि झेपावे पक्षिणी I पिली पडताचि धरणी I I

**प्रश्न ७. अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा (कोणतेही तीन)** **३**

१) लेखक बार्कमध्ये कोणत्या पदावर जॉईन झाला?

२) लेखकाने किती वर्षांपूर्वीचे दोन अनुभव सांगितले आहेत?

३) कोणत्या मुलांना लेखकाने हे पत्र लिहिले आहे?

४) दुसऱ्या अनुभवातून डॉक्टर अनिल काकोडकर कोणता धडा शिकले?

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा कोणतेही एक.** **२**

१) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते?

२) पार्कची थोडक्यात माहिती लिहा?

**प्रश्न ८) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा.** **६**

**१)जगातील पाणी संपले तर.........**

पाणी म्हणजे जीवन -- पाण्यामुळे स्वच्छता -- प्राणी,पक्षी, झाडे सर्वांसाठी पाण्याची गरज --- पाणी नाहीसे होण्याची कारणे -- पाण्याशिवाय जगाची अवस्था --- पाणी टिकवण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत ----- पाणी नसेल तर होणारे दुष्परिणाम.

**२) म्हाताऱ्या बैलाचे आत्मवृत्त**

जन्म -- बालपण -- तारुण्यातील आनंदी व कष्टाळू जीवन - शेतकऱ्याच्या प्रगतीला कारणीभूत - वय झाले -- होणारा त्रास -- जीवनाचे सार्थक.

**३)पुस्तक एक खरा मित्र**

पुस्तकाचे आपल्या जीवनातील स्थाने -- प्रेरणा देणारे , संवेदना जागवणे,शब्दशक्ती लहानपणापासून पुस्तकांनी दिलेला आनंद --- केलेली जडणघडण -- ग्रंथांनी केलेला उपदेश -- खरा नि:स्वार्थी मित्र -- कायम साथ देणारा -- भावना,विचार यांचे पुस्तकांनी केलेले पोषण -- समाजमन घडवण्यात पुस्तकांचा वाटा.

**प्रश्न ९. अ) खालील मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक व तात्पर्य लिहा (कोणतेही १)** **५**

राम व अमीर दोघे मित्र.......अमीर मुसलमान... ... रामच्या आईकडून अमीर मुसलमान असल्याने त्याचा अपमान ..... एकदा रामची आई आजारी ........रक्ताची गरज....... अमीरने रक्त देणे ..... रामची आई वाचली...... रामच्या आईचा अमीरबद्दल असलेला गैरसमज दूर ..... तात्पर्य.

**किँवा**

एक राजा.... लोभी.....देवाची भक्ती...देवाकडून वर ......स्पर्श केला ......सोने ... असह्य ..राजाची मुलगी सोन्याची....देवाचा धावा....देव पुन्हा प्रसन्न.तात्पर्य

**आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा** **४**

राधा /राधा साने, विद्यार्थी प्रतिनिधी, विद्या विकास विद्यालय, वरळी, मुंबई- 31 येथून शाळेसमोरच्या रस्त्यावरील फिरत्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या वाढत्या संख्येविषयी विभागीय अधिकारी ,आरोग्य खाते, मुंबई महानगरपालिका ,मुंबई यांना तक्रार करणारे पत्र लिहितो/लिहिते.

**किंवा**

अनिल /अनिता पाटील, रुईकर विद्यालय, मु. पो. आंबेगाव येथून मा. व्यवस्थापक, भारत विज्ञान भांडार, लक्ष्मी रोड, पुणे यांना विद्यार्थी प्रतिनिधी, या नात्याने प्रयोग शाळेसाठी साहित्याची मागणी करणारे पत्र लिहितो/ लिहिते.

**....All The Best....**

EDUTECH ACADEMY
NURTURING THE FUTURE....
SCHOOL SECTION

CIDCO BRANCH
9168 444 999
1ST FLOOR, INFRONT OF BALIRAM PATIL SCHOOL

HARSUL-SAWANGI BRANCH
9168 044 999
1ST FLOOR, INFRONT OF PANAD SUPER MARKET